।। हरि ॐ ।।

।। अवधूत चिन्तन श्रीगुरुदेवदत्त ।। ।। ॐ नम:श्चण्डिकायै ।।

।। ॐ मन:सामर्थ्यदाता श्रीअनिरुद्धाय नम: ।।

ए.पी.डी.डी.एस पत्रिका क्र. १०

# ।। अंबज्ञ ।।

## १) अंबज्ञ हा शब्द व त्यामागील भाव कुठून माहीत झाला?

परमपूज्य सद्‌गुरु श्रीअनिरुद्ध बापूंनी श्रद्धावानांकरिता २०१२ दत्तजयंतीच्या दिवशी एक अद्वितीय भेट 'मातृवात्सल्य उपनिषद' अर्थात् 'श्रीस्वस्तिक्षेम विद्या' ह्या ग्रंथरूपात दिली.

ह्या ग्रंथाच्या सातव्या अध्यायात कश्यपपत्नी व इंद्रमाता अदितिमतीची गोष्ट येते ह्या गोष्टीत अदितिमतिच्या अंबज्ञतेमुळेच सर्व परिस्थिती विरोधात असूनही आलेला कोणताही अडथळा अदितिमतिला थांबवू शकला नाही.

ही कथा ग्रंथातून वाचायलाच हवी. पण महत्त्वाचे म्हणजे ह्या कथेत आरंभापासून अंतापर्यंत अंबज्ञता असल्यामुळे वृत्रासुराचे अस्तित्त्व जाणवलेच नाही कारण अंबज्ञता नसते, तेथेच वृत्राचे जन्म व कार्य होतात. (वृत्र म्हणजे मनुष्याला पापे करावयास लावणारी सर्वात घोर शक्ती, जी कधी अज्ञान बनून येते तर कधी अंध:कार बनून, जी कधी नकारात्मक विचार बनून येते तर कधी निराशा बनून.)

## २) 'अंबज्ञ' म्हणजे काय?

अंबज्ञता म्हणजे आदिमातेविषयी श्रद्धावानाच्या मनात असणारी व कधीही न ढळू शकणारी असीम कृतज्ञता.

मी चण्डिकेचा म्हणजेच मोठ्या आईचा कृतज्ञ आहे कारण तिने मला जीवन दिले आहे. अंबज्ञ शब्दात अशी सिद्धी आहे की, ह्याने आपली कृतज्ञता आदिमातेच्या चरणी पोहोचते. सद्‌गुरु

श्रीअनिरुद्धांनी ती प्रत्येकासाठी खुली केली आहे. परमात्मा जसा आई चण्डिकेचा अंबज्ञ आहे, तसे आपल्याला आई चण्डिके प्रति अंबज्ञ व तिचा पुत्र असलेल्या परमात्म्याप्रति कृतज्ञ रहायचे आहे.

**३) सर्व सुखांमागील रहस्य कोणते?**

अंबज्ञता हेच सर्व सुखामागील रहस्य आहे.

**४) सर्व श्रद्धावान अलिकडे अंबज्ञ अंबज्ञ असा उच्चार करताना दिसतात ते का?**

परमपूज्य सद्गुरु श्रीअनिरुद्धांनी अंबज्ञ ह्या शब्दाबद्दल गुरुवार दि. २४ जानेवारी २०१३ रोजी प्रवचनाकडून अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी श्रद्धावानांना 'अंबज्ञ' ह्या शब्दाला आपल्या जीवनाचा भाग बनविण्यास सांगितले. तो रोजच्या वापरात आणायला सांगितले.

कुणाला थँक्स म्हणतानाही बरोबर 'अंबज्ञ' म्हणावयास सांगितले. अशाने ज्याला थँक्स म्हणू त्यालाही फायदा होईल. कोरडेपणाने जे थँक्स जातात त्याऐवजीबरोबर अंबज्ञ म्हणण्याने दोघांनाही फायदा होईल.

आपल्या शरीराला, मनाला, बुद्धीला, प्राणांना आजूबाजूच्या वातावरणाला सगळ्यांना उचित ठेवणारी ताकद ह्या शब्दामध्ये आहे.

ह्या अंबज्ञ शब्दामध्ये दोन्ही टोकाच्या गोष्टी एकाच वेळेस तुमच्यासाठी एकाच ठिकाणाहून वापरून जो बॅलन्स साधला पाहिजे तो साधणारी शक्ती आहे. म्हणूनच वारंवार ह्याचा उच्चार करत रहाणे आपल्यासाठी अतिशय लाभदायक आहे.

सकाळी उठताना, रात्री झोपताना, कोणत्याही शुभकार्याची सुरूवात करताना, जेवणानंतर, परीक्षेला जाताना, उत्तरपत्रिका सोडविताना, कठीण प्रश्न सुटत नाही तेव्हा, कठीण प्रश्न (समस्या) सुटल्यावर, रोज ऑफीसला पोहचल्यावर, थोडक्यात माझ्या जीवनात जे काही कार्य करायला मी सुरूवात करतो त्यावेळी मला 'मी अंबज्ञ आहे' असे म्हणायचे आहे. दिवसातून २४ वेळा म्हटला व दुसऱ्या दिवशी विसरलो म्हणून मोठी आई काही रागवणार नाही.

## ५) ‘अंबज्ञ’चा जप करावा का?

‘अंबज्ञ’ जप केला तर त्याचा आपल्याला नक्की उपयोग होईल पण त्यापेक्षा तो आपल्या जीवनात फीट केल्यास अधिक श्रेयस्कर आहे. आपण आपल्या जीवनात अंबज्ञ बनलो तर खूपच चांगलं. आपल्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या प्रत्येक छोट्या मोठ्या गोष्टींमध्ये अंबज्ञ शब्द आपोआप यायला लागला हवा, इतके ह्या शब्दाला किंबहुना ह्या भावाला आत्मसात केले पाहिजे. ‘अंबज्ञ’आमच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला पाहिजे. मोठ्याने म्हणायला पाहिजे असे मुळीच नाही. मनातल्या मनात म्हटले तरी पुरेसे आहे.

## ६) अंबज्ञ म्हणताना भाव काय असावा?

अंबज्ञ हा शब्द आमच्याकडून आदिमातेचा पुत्र परमात्मा म्हणवून घेतोय हा भाव ठेवावा. त्याला पाहिजे तेवढ्या वेळा तो आमच्याकडून म्हणवून घेईल. आम्ही फक्त तयार असलं पाहिजे. आपल्याला ह्या शब्दाचा भार स्वत:च्या डोक्यावर घ्यायचा नाही आपल्या सद्‌गुरुंना पाहिजे तेव्हा ते आपल्याकडून अंबज्ञचा उच्चार करुन घेणारच आहेत.

एखाद्या व्यक्तीच्या नावाला मात्र आपल्याला ‘ज्ञ’ लावून चालणार नाही. हे फक्त परमात्म्याच्या बाबतीतच आपण करु शकतो.

## ७) ‘मी खरंच अंबज्ञ आहे का?’ असा प्रश्न पडला तर काय करावे?

परमपूज्य बापू ह्यासंबंधी बोलताना म्हणाले, ‘‘तुम्हाला कधी वाटलं कि तुम्ही अंबज्ञ नाही आहात. तर ते नाकारायचं. कारण जी व्यक्ती ‘अंबज्ञ’ शब्द उच्चारते ती तेवढ्या वेळापुरती तरी अंबज्ञ असतेच हा माझा संकल्प आहे म्हणून.

पापी असो, पुण्यवान असो, काहीही असो, पण दिवसातून जेवढ्या वेळा तुम्ही अंबज्ञ असे म्हणता तेवढ्या क्षणांपुरते तुम्ही नक्कीच अंबज्ञ असणारच.’’

## ८) वर्धमान व्रताधिराजाच्या वेळी अंबज्ञ म्हणावयास हवे काय?

होय. गुरुवार दि. २४ जानेवारी २०१३च्या प्रवचनातूनच परमपूज्य बापूंनी वर्धमान व्रताधिराजाच्या काळात दररोज व्रतपुष्प झाल्यावर ‘मी अंबज्ञ आहे’ असे म्हणावयास सांगितले आहे व आपल्या

बापूंनी आपल्याला अभयवचन दिले कि, २०२५ सालापर्यंत किंवा आपले जीवनकार्य असेपर्यंत जो श्रद्धावान मनापासून 'मी अंबज्ञ आहे' असे म्हणेल त्या व्यक्तीचा प्रत्येक जन्म बापूंबरोबरच हाईल. बापू प्रत्येक जन्मात आपल्याबरोबर असणारच आहेत.

**९) माझ्या दैनंदिन जीवनाव्यतिरिक्त मला कोणत्या प्रसंगी 'मी अंबज्ञ आहे' किंवा फक्त 'अंबज्ञ' आहे असे म्हणायचे आहे?**

सद्‌गुरु श्री अनिरुद्ध ह्याबाबत श्रद्धावानांना दिग्दर्शन करतात की,

१) जेव्हा मला एकटं वाटेल तेव्हा अंबज्ञ म्हणा. त्या क्षणाला तुमचे एकटेपण संपलेले असेल. माझा सद्‌गुरु माझ्या मागेपुढे असणारच.

२) रस्त्यावरून जातायेताना काही वाईट किंवा शुभ बघितले तर अंबज्ञ म्हणा. एखादा अपघात बघितला व अंबज्ञ म्हटले तर अपघातग्रस्त व्यक्तीलाही त्याचा फायदा होईल. वाईट प्रसंग पाहिल्यावर अंबज्ञ म्हणावे कारण आदिमातेच्या व परमात्म्याच्या कृपेने असा प्रसंग आपल्या जीवनात नाही घडला.

३) एखादी गोष्ट आपल्या मनाविरुद्ध घडली तर अंबज्ञ म्हणा.

४) आपल्या मनात अनेक इच्छा असतात. आपण अनेक गोष्टी ठरवतो. काही पूर्ण होतात काही पूर्ण होत नाहीत. दरवर्षी त्याच त्याच गोष्टी ठरवतो पण पूर्ण होत नाही. अशा वेळी रोज सकाळी ''मी ती गोष्ट आज पूर्ण करणार आहे अंबज्ञ'' असं म्हणायचे. ती पूर्ण झाली नाही तर रात्री झोपताना म्हणायचं ''मी ती गोष्ट आज पूर्ण केली नाही अंबज्ञ'' . ती गोष्ट उचित असल्यास काही दिवसांनी आपोआप घडायला लागेल. हे अनिरुद्धांचे वचन आहे.

**१०) अंबज्ञ ह्या शब्दाचा आपल्या जीवनात जागर करायचा का?**

हो, कारण अंबज्ञ ह्या शब्दाच्या मागे चण्डिकापुत्राची अर्थात सद्‌गुरु श्रीअनिरुद्धांची ताकद (सामर्थ्य) आहे. अनिरुद्धांनी श्रद्धावानांना ग्वाही दिली आहे की, ''जो अंबज्ञ ह्या रस्त्याने प्रवास करणार आहे त्याच्या रस्त्यावर माईल स्टोन नाहीत(मैलाचे दगड), पाट्या नाहीत कारण अंबज्ञ ह्या रस्त्यावरील प्रत्येक गाव तुमच्या ओळखीचे असेल, प्रत्येक दिशा तुमच्या माहितीची असेल. प्रत्येक वाहन तुम्हाला उपलब्ध असेल. घरात जसे आम्ही सहज चालतो इतका सहज पथ तुम्हाला प्राप्त झालेला असेल.'' फक्त एवढेच म्हणायचे–

| | |
|---|---|
| **अम्बज्ञोऽस्मि** | **(संस्कृत)** |
| **मी अंबज्ञ आहे** | **(मराठी)** |
| **मै अंबज्ञ हूँ।** | **(हिंदी)** |
| **आय ॲम अंबज्ञ** | **(इंग्लिश)** |
| **हू अंबज्ञ छू** | **(गुजराती)** |
| **नेनु अंबज्ञ नि** | **(तेलुगु)** |
| **नानु अंबज्ञ इद्देने** | **(कन्नड)** |
| **नान् अंबज्ञ इरुपेन** | **(तामिळ)** |
| **आमी अंबज्ञ आखी** | **(बंगाली)** |
| **न्यान् अंबज्ञ आन्** | **(मलयाळम्)** |
| **मैं अंबज्ञ हॅ** | **(पंजाबी)** |
| **मय अंबज्ञ असू** | **(आसामी)** |
| **मूं अंबज्ञ रहूची** | **(ओरिया)** |

ज्याला ज्या भाषेत म्हणायचे, त्या बोली भाषेत म्हणायचे तसे म्हणू शकतो.

**११) सद्‌गुरु श्रीअनिरुद्धांनी दिलेलं अचिन्त्यदान आहे का?**

हो. सद्‌गुरु श्रीअनिरुद्धांचे हे महावाक्य आहे व अनिरुद्धांनी श्रद्धावानांना दिलेले हे अचिन्त्यदान आहे. पुढे येणाऱ्या कठीण काळातून सर्व श्रद्धावान सुखरूप पुढे जावेत म्हणून सलग तीन गुरुवारी श्रद्धावानांना अचिन्त्यदान दिले ते म्हणजे,

१) दि. ३ जानेवारी २०१३ च्या दिवशी स्त्रियांवर व पुरुषावरही अतिप्रसंग घडू नये म्हणून जाहीर केलेली पाच कलमी योजना.

२) दि. १७ जानेवारी २०१३ रोजी दिलेली 'स्वस्तिक्षेम संवाद' उपासना.

३) दि. २४ जानेवारी २०१३ रोजी श्रद्धावानाच्या उद्धाराचं दिलेलं वाक्य 'मी अंबज्ञ आहे.'

हे अनिरुद्धराया, तू युगानुयुगे आम्हाला देतच आला आहेस परंतु आमच्या अज्ञानामुळे त्याचा आम्हाला विसर पडतो. म्हणून आम्ही सर्व श्रद्धावान तुझ्या चरणी प्रार्थना करतो की, आम्हाला 'मी अंबज्ञ आहे' ह्या तुझ्या महावाक्याचा कधीही विसर पडू देऊ नकोस. ह्या जन्मात तर नाहीच पण पुढील अनेक जन्मातही.

**जय जय अनिरुद्ध हरि**

**मी अंबज्ञ आहे.**

।। हरि ॐ ।।